# अर्थशास्त्राची ओळख





https://www.google.co.in/search?q=development+of+economics&source=lnms&tbm=isch&sa=X&ei=Jac7U8CLCsbsrAeVw4HQCw&sqi=2&ved=0CAYQ_AUoAQ&biw=1024&bih=667#facrc=_&imgdii=_&imgrc=c_weU6CtV3GbcM%253A%3B7F6OcJATPM7P8M%3Bhttp%253A%252F%252Fcommunity.mis.temple.edu%252Fgavingrant%252Ffiles%252F2011%2


# अर्थशास्त्राचा इतिहास

- विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो आज आपण आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडीत परंतु आपल्यासाठी नवीन विषयाची माहिती या पाठातून घेणार आहोत. हो,मला माहीत आहे तुमची उत्सुकता ताणली गेली आहे. मी आज कोणत्या विषयाबद्दल बोलते आहे ते! बरोबर ना!! मग आज आपण अर्थशास्त्र या विषयाबद्दल  बोलणार आहोत.मग याविषयी आपण इतिहासातील एका छानशा भागातून माहिती घेऊयात.चला तर........

# मानवी प्रगतीच्या विविध अवस्था




मानवाची
कंदमुळे,फळे
खाऊन
जगण्याची
अवस्था



# मानवाची शिकारी अवस्था




# अग्नीचा शोध लागल्यानंतरची गुहेतील अवस्था



मानवाची शेतीचा शोध लागल्यानंतरची अवस्था

http://factsanddetails.com/world/cat56/sub365/item1923.html



वस्तू विनिमयाची अवस्था

# अर्थशास्त्राची सुरुवात

- विद्यार्थी मित्रांनो,तुम्ही आता जी चित्रे पहिली त्यावरून तुम्हाला समजलेच असेल की आदिमानवापासून मानवाचा प्रवास भटकंतीपासून ते स्थिर अवस्था;जी त्याला शेतीच्या शोधामुळे मिळाली त्या अवस्थेपर्यंत झाला.आणि आता या अवस्थेनंतर मानवाची वस्तू विनिमयाकडे(देवाणघेवाण) जी स्थित्यंतरे झाली;त्यामुळे अर्थशास्त्राची सुरुवात झाली. म्हणजेच अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक बाजूंचा विचार करते असे आपण म्हणू शकतो.


# अर्थशास्त्र आणि आपले दैनंदिन जीवन

- तुम्हाला तुमच्या आईने १०० रुपये देऊन दुकानातून १ किलो साखर आणायला सांगितले तर तुम्ही साखरेचा भाव विचारून एक किलो साखरेचे पैसे देऊन बाकीचे पैसे घरी घेऊन येता.म्हणजेच अर्थशास्त्र आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेले शास्त्र आहे.

# विनिमय पद्धत

- जसजशी मानवाची वेगवेगळया अवस्थांमधून प्रगती होत गेली तसतशी त्याने त्याला हव्या असलेल्या वस्तूच्या बदल्यात त्याच्याकडील वस्तू देण्यास सुरुवात केली. ह्याच पद्धतीला वस्तू विनिमय पद्धती असे म्हटले जाते.या वस्तू विनिमय पद्धतीलाच आजच्या काळात व्यापार असे म्हटले जाते.

"मानवाने वस्तूच्या बदल्यात वस्तूची देवाण-घेवाण सुरु केली त्याला वस्तू विनिमय पद्धत असे म्हणतात."


वेळ
पैसा
श्रम
भूमी
साधने
मानव
अर्थशास्त्र

# अर्थशास्त्र म्हणजे काय?

- ‘अर्थशास्त्र’ ही संज्ञा ओईकोनोमिया(OIKONOMIA) या ग्रीक शब्दापासून बनली आहे.
- याचा अर्थ ‘कौटुंबिक व्यवस्थापन’असा आहे.
- समाजातील विविध आर्थिक घटकांशी संबंधित मानवी वर्तणुकीचा स्वतंत्र अभ्यास म्हणून अर्थशास्त्राचा विकास झाला.
- असा अर्थ असण्यामागे उद्देश कौटुंबिक व्यवस्थापन आणि अर्थशास्त्राचे कार्य यात खूप साम्य आहे.
- आता आपण अर्थशास्त्राविषयी ज्या वेगवेगळया शास्त्रज्ञांनी विविध व्याख्या केल्या त्यांची माहिती घेऊया.

# अर्थशात्राच्या विविध व्याख्या

ॲडम स्मिथ यांच्या मते,‘अर्थशास्त्र हे संपत्तीचे शास्त्र आहे.’

प्रा.आल्फ्रेड मार्शल यांचे मते ‘अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.’

लिओनेल रॉबिन्स यांचे मते ‘अनंत गरजा आणि मर्यादित परंतु पर्यायी उपयोगाची साधने यांचा मेळ साधताना करण्यात येणाऱ्या मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय.’


# पॉल अँथोनी सॅम्यूएलसन
## (१५मे१९१५ ते १३ डिसेंबर२००९)



- यांचा जन्म **इंडियाना**,(अमेरिका) परगण्यात झाला.
- हे **पहिले** असे **अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ** होते ज्यांनी अर्थशास्त्रातील **नोबेल** पारितोषिक मिळविले.
- त्यांच्या मते '**अर्थशास्त्र ही सामाजिक शास्त्रांची सम्राज्ञी आहे.**'

# अॅडम स्मिथ


(१७२३ ते १७९०)




- अॅडम स्मिथ यांचा जन्म स्कॉटलंडमधील एका गावात झाला.तेथे ते त्यांच्या आईबरोबर राहत.अवघ्या १४ वर्षांचे असताना ते शिष्यवृत्ती मिळवून ग्लासगो विद्यापीठात शिकायला गेले.त्यानंतर त्यांनी ऑक्स्फोर्ड विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात युरोपियन साहित्याचा अभ्यास केला.
- अॅडम स्मिथ यांना अर्थशास्त्राचे जनक मानले जाते.
- त्यांनी सन १७७६ मध्ये 'राष्ट्राची संपत्ती'हा ग्रंथात 'अर्थशास्त्र हे संपत्तीचे शास्त्र आहे' असे म्हटले आहे.त्यांनी 'मुक्त बाजारपेठ'ही संकल्पना मांडली.


# आल्फ्रेड मार्शल

## (२६ जुलै १८४२-१३ जुलै १९२४)



- आल्फ्रेड मार्शल यांचा जन्म क्लाफेम,इंग्लंड येथे झाला.आल्फ्रेड मार्शल हेदेखील एक प्रभावी अर्थशास्त्रज्ञ होत.
- यांनी १८९० मध्ये ‘अर्थशास्त्राची मूलतत्वे’(Principles of Economics) हा ग्रंथ लिहिला.
- त्यांच्या मते “अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.”
- त्यांनी ‘पुरवठा व मागणी’,’सीमान्त उपयोगिता आणि उत्पादन खर्च’ या कल्पना मांडल्या.


# आल्फ्रेड मार्शल यांचा पुरवठा आणि मागणी आलेख



# लिओनेल रॉबिन्स
## (२२जुलै १८९८ -१५ मे १९८४)



- लिओनेल चार्ल्स रॉबिन्स लंडनमधील एका जहागीरदार घराण्यात जन्माला आले.
- ते ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ आणि 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' चे अर्थशास्त्र विभाग प्रमुख होते.
- त्यांनी १९३२ मध्ये 'अर्थशास्त्राचे स्वरूप आणि महत्त्व'(Nature & Significance of Economics)हा ग्रंथ लिहिला.
- "अनंत गरजा आणि मर्यादित परंतु पर्यायी उपयोगाची साधने यांचा मेल साधताना करण्यात येणाऱ्या मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय"


मानव बुद्धिमान समाजप्रिय
सतत वाढत जाणारी लोकसंख्या
अमर्याद गरजा
मर्यादित साधनसंपत्ती
मर्यादित साधनसंपत्तीचा आणि अमर्याद गरजांचा मेळ घालण्यासाठी
अर्थशास्त्राचा अभ्यास का करावा?

# अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व

# बौद्धिक मूल्य



- दैनंदिन गरजांसाठी मानव परस्परावलंबी आहे.
- अर्थशास्त्रामुळे दृष्टीकोन व्यक्तीचा विस्तारतो व समतोल विचारांना सहाय्यक ठरतो.

# व्यावहारिक मूल्य



- अर्थशास्त्राचे ज्ञान उपभोक्त्याला उत्पन्नानुसार खर्चाची मांडणीस मदत करते.
- त्यातून अधिक समाधान मिळते.
- उत्पादकाला साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करून अधिक नफा मिळू शकतो.
- शिवाय किंमत निश्चितीस मदत होते.

# शासन संस्था







- बेरोजगारी,भाववाढ,दारिद्र्य या समस्या जाणून घेणे शक्य होते.
- शिवाय राजकोषीय धोरण,करयोजना आखण्यासाठी मदत होते.
- अर्थव्यवस्थ्येसाठी महसूल मिळविण्यास मदत.

# उपक्रम

# उपक्रम

- प्राचीन मानव व आधुनिक मानव यांच्या आर्थिक जीवनाचा तुलनात्मक अहवाल  तयार करा.
- ‘अर्थशास्त्र आपल्या कुटुंबाचे अंदाजपत्रक आहे’स्पष्ट करा.
- तुमचे विचार,कल्पना आणि शंकासुद्धा तुम्ही खालील mail id वर पाठवू शकता.

# मूल्यमापन

**जोड्या लावा.**

| **शास्त्रज्ञ** | **कार्य** |
| --- | --- |
| १)पी.ए.सॅम्युएलसन | अ)अर्थशास्त्राचे स्वरूप व महत्त्व |
| २)अॅडम स्मिथ | ब)राष्ट्राची संपत्ती |
| ३)प्रा.आल्फ्रेड मार्शल | क)नोबेल पारितोषिक |
| ४)लिओनेल रॉबिन्स | ड)अर्थशास्त्राची मूलतत्वे |

उत्तरे(**१-क,२-ब,३-ड,४-अ**)